


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २८६ वा | बुधवार दि २८ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये




# भाजपकडून शिंदेसेनेला विशेष प्रस्ताव बहुमत भक्कम करण्यासाठी तिरकी चाल...

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबई महापालिका निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवणाऱ्या भाजप , शिंदेसेनेनं आता बहुमताचा आकडा अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीनं पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी भाजप, शिंदेसेना त्यांच्या नगरसेवकांची एकत्रित गट नोंदणी करणार आहेत. शिंदेसेना त्यांच्या नगरसेवकांची स्वतंत्र नोंदणी करेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. महापालिकेतील स्वतंत्र अस्तित्व कायम राखण्यासाठी शिंदेसेना वेगळा गट म्हणून नोंदणी करेल, अशी अटकळ होती. पण सत्ता स्थापनेच्या घडामोडींमध्ये ट्विस्ट आला आहे. भाजप आणि शिंदेसेना यांची एकत्र गट नोंदणी होणार आहे. स्वतंत्र गट नोंदणी करण्याऐवजी एकत्रित नोंदणी करुन बहुमताचा आकडा भक्कम करण्यावर भर दिला जात आहे. याबद्दलचा प्रस्ताव भाजपकडून शिंदेसेनेला पाठवण्यात आला आहे. गटनेतेपद भाजपला आणि प्रतोदपद शिंदेसेनेला असा प्रस्ताव शिंदेसेनेला पाठवला गेला आहे. यावर शिंदेसेना काय भूमिका घेणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. मुंबई महापालिकेत भाजपला ८९, तर शिंदेसेनेला २९ जागा मिळाल्या आहेत. या आकड्यांच्या जोरावर स्थायी समितीवर भाजपचे १०, तर शिंदेसेनेचे ३ सदस्य असतील. स्थायी समितीत एकूण २६ सदस्य असतात. दोन्ही पक्षांनी स्वतंत्र नोंदणी केल्यास स्थायी समितीत दोघांचं संख्याबळ १३ असेल. अशा परिस्थितीत २६ सदस्यीय समितीत विविध प्रस्ताव पारित करुन घेताना महायुतीची दमछाक होईल. त्यामुळेच दोन्ही पक्ष एकच गट म्हणून नोंदणी करण्याच्या तयारीत आहेत. भाजप आणि शिंदेसेनेनं एकत्रित गटनोंदणी केल्यास स्थायी समितीत त्यांचं संख्याबळ मजबूत असेल. याचा फायदा त्यांना महत्वाचे प्रस्ताव मंजूर करुन घेताना होईल. मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ७४ हजार कोटींचा आहे. महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या स्थायी समितीकडे असतात.



त्यामुळे स्थायी समितीत स्पष्ट बहुमत मिळवण्यासाठी भाजपचे प्रयत्न सुरु आहेत. शिंदेसेनेकडून त्यांच्या २९ नगरसेवकांची नोंद आज नवी मुंबईतील कोकण भवनात स्वतंत्र गट म्हणून केली जाणार होती. तशा सूचना सर्व नगरसेवकांना देण्यात आल्या. पण ऐनवेळी हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. विशेष म्हणजे शिंदेसेनेनं त्यांच्या गट नोंदणीचा कार्यक्रम दोनदा रद्द केला आहे. आज सगळ्या नगरसेवकांना नवी मुंबईला नेण्यासाठी बसदेखील बोलावण्यात आली होती. पण अखेरच्या क्षणी नोंदणीचा कार्यक्रम रद्द करण्यात आला.

# मध्यरात्री थरकाप उडवणारा सशस्त्र दरोडा!

## अग्रवाल कुटुंबावर तलवारीने हल्ला; बापलेक गंभीर जखमी...

जनसंचलन/ खामगाव

जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजवणारी धक्कादायक घटना खामगाव शहरानजीकच्या वाडी परिसरात मध्यरात्री घडली. अग्रवाल कुटुंबाच्या घरावर चार ते पाच सशस्त्र दरोडेखोरांनी थेट धाडसी हल्ला चढवत तलवार व चाकूने बापलेकावर जीवघेणा वार केल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. मयंक अग्रवाल व मनोज अग्रवाल यांच्या घरात मध्यरात्री अज्ञात दरोडेखोरांनी जबरदस्तीने प्रवेश केला. घरात घुसताच दरोडेखोरांनी थेट मनोज अग्रवाल व त्यांचे पुत्र मयंक अग्रवाल यांच्यावर चाकू व तलवारीने सपासप वार केले. रक्तबंबाळ अवस्थेत कोसळलेल्या दोघांचीही प्रकृती गंभीर असून त्यांना तातडीने अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात हलवण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले आहे. ही संपूर्ण थरारक घटना घरात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्यात चार दरोडेखोर स्पष्टपणे दिसत आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षकांसह वरिष्ठ पोलीस अधिकारी, स्वान पथक आणि फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसर सील करून तपास सुरू करण्यात आला आहे.मध्यवस्तीतील घरावर अशा प्रकारे सशस्त्र हल्ला झाल्याने



खामगाव शहर व परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरोडेखोरांना कायद्याची भीती उरली आहे का? असा थेट सवाल नागरिकांकडून केला जात आहे. पोलिसांनी दरोडेखोरांचा शोध युद्धपातळीवर सुरू असल्याचे सांगितले

# बँक कर्मचाऱ्यांचा ५ दिवसांच्या आठवड्यासाठी देशव्यापी संप

जनसंचलन/बुलढाणा

बँक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे केंद्र सरकार आणि इंडियन बँक्स असोसिएशनचे लक्ष वेधण्यासाठी आज, २७ जानेवारी रोजी देशभरातील बँक कर्मचाऱ्यांनी संपाची हाक दिली आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन द्वारे पुकारण्यात आलेल्या या संपामुळे स्टेट बँक ऑफ इंडिया पीएनबी आणि बँक ऑफ बडोदा यांसारख्या प्रमुख राष्ट्रीयकृत बँकांमधील कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. बुलढाणा येथील भारतीय स्टेट बँक च्या शाखेसमोर सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या कर्मचाऱ्यांनी एकत्र येत केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. गेल्या काही दिवसांपासून हे आंदोलन टप्प्याटप्प्याने सुरू होते, मात्र आज बँक बंद ठेवून कर्मचाऱ्यांनी आपला तीव्र निषेध नोंदवला. आमच्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करा, प्रशासन, अशा घोषणांनी बँक परिसर दणाणून गेला होता. ५ दिवसांचा कार्यकाळ बँक कर्मचाऱ्यांची प्रलंबित मागणी म्हणजे बँकांमध्ये पाच दिवसांचा कामाचा आठवडा लागू करणे या मागण्यासाठी विलंबाचा निषेध करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात बोलताना कर्मचारी संघटनेचे विभागीय सचिव (अमरावती विभाग) श्री. अविनाश बोचरे यांनी सांगितले की, सरकारकडे वारंवार अर्ज व विनंत्या करूनही मागणी मान्य न झाल्याने संघटनेला संपाचा मार्ग अवलंबावा लागला. आज ग्राहकांना झालेल्या गैरसोयीबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. तसेच मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# संचालकांबाबतची संदिग्धता...




बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल्यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे. बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? ङ्गपूर्ण वेळ संचालकफ ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते.

महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु ङ्गसलगफ या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत ङ्गसलगफ शब्दाऐवजी ङ्गएकूणफ असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली! केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती. १) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती. बँकिंग नियमन कायद्यामधील नवीन तरतुदींनुसार मात्र संबंधित व्यक्तीने संचालक म्हणून सलग १० वर्षांचा कालावधी एकदा जरी पूर्ण केला तरी त्यास त्या संस्थेवर आयुष्यभरात पुन्हा कधीही संचालक होता येणार नाही. बँकिंग नियमन कायद्यातील नवीन दुरुस्ती वाचताना, त्यामध्ये ङ्गसलग १० वर्षेफ हा उल्लेख केल्याने एक ऑगस्ट २०२५ नंतर होणाऱ्या निवडणुकींद्वारे प्रथम निवडून येणारे संचालक १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देतील व थोड्या कालावधीनंतर निवडणुकीद्वारे पुनश्च निवडून येतील व तहहयात संचालक राहू शकतील. परंतु संबंधित कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी, सलग दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या संचालकांना एक ऑगस्ट २०२५ नंतर नवीन तरतुदींनुसार त्या संस्थेचे कधीच पदाधिकारी होता येणार नाही. राज्यस्तरीय नागरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर त्या त्या राज्यांत स्थापन झालेल्या निवडणूक प्राधिकरण ंचे नियंत्रण असते. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यातील तरतुदींच्या आधारे स्वत:च्या कायद्यात बदल न करता, निवडणूक प्राधिकरण एखाद्या उमेदवारास अपात्र ठरविण्याचे धाडस करेल? कारण २०२१ नंतर झालेल्या निवडणुकांसाठी बँकिंग नियमन कायद्यात त्या वेळी आठ वर्षांची तरतूद असतानाही राज्य निवडणूक प्राधिकरणाने एकाही उमेदवारास अपात्र ठरविलेले नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दोन्ही विमानतळ मेट्रोने जोडणार; मुख्यमंत्री फडणवीसांकडून मेट्रो-८ ला हिरवा कंदील...

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबई आणि नवी मुंबईतील अंतर कमी करण्यासोबतच प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी राज्य सरकारने आज एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ () ते आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ () या दोन्ही महत्त्वाच्या विमानतळांना जोडणाऱ्या मेट्रो लाइन ८ च्या आराखड्याला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अधिकृत मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मुंबईच्या विकासाला नवी गती देणारे अनेक निर्णय घेण्यात आले. नव्याने मंजूर झालेली ही मेट्रो लाईन एकूण ३५ किलोमीटर लांबीची असणार आहे. यामध्ये ९.२५ किमीचा मार्ग हा भूमिगत () असेल, तर २४ किमीचा मार्ग उन्नत () असणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी या मार्गावर एकूण २० स्थानके प्रस्तावित आहेत, ज्यापैकी ६ स्थानके जमिनीखाली आणि १४ स्थानके जमिनीच्या वर असतील. या मेट्रोमुळे दोन्ही विमानतळांमधील प्रवासाचा वेळ कमालीचा कमी होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाबाबत अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. पुढील सहा महिन्यांच्या आत जमिनी अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण करावी,असे निर्देश त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. प्रकल्प प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वीच सर्व तांत्रिक आणि कायदेशीर परवानग्या मिळवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. काम सुरू झाल्यानंतर पुढील तीन वर्षांच्या विक्रमी वेळेत हे मेट्रोचे काम पूर्ण करून ती लोकांच्या सेवेत आणण्याचा सरकारचा मानस आहे. केवळ मुंबईच नव्हे, तर राज्याच्या इतर भागांसाठीही मंत्रिमंडळाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा विस्तार, नाशिक शहर परिक्रमा मार्ग ( ) आणि सुरजागड महामार्गाच्या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे. या विकासकामांच्या माध्यमातून राज्याचे रस्ते आणि दळणवळण जाळे अधिक सक्षम होणार आहे. मुंबईतील मेट्रो ८ ही केवळ वाहतुकीची सोय नसून, ती मुंबईच्या भविष्यातील इकोनॉमिक कॉरिडॉरचा कणा ठरणार आहे.



# काँग्रेसकडून ठाकरेसेनेला इशारा; तोंड उघडण्यासाठी नाक दाबण्याची खेळी

**वृत्तसंस्था/ परभणी**

महापालिकेत पाठिंबा देण्यावरुन काँग्रेस आणि ठाकरेसेनेत एकमेकांवर कुरघोड्या सुरु आहेत. चंद्रपूर आणि परभणी महापालिकांमध्ये कोणत्याच पक्षाला बहुमताचा आकडा गाठता आलेला नाही. चंद्रपुरात काँग्रेसला ठाकरेसेनेची, तर परभणीत ठाकरेसेनेला काँग्रेसची गरज आहे. दोन्ही पक्षांनी एकमेकांना मदत केली, तरच त्यांना सत्ता मिळू शकते. याच सत्तेसाठी आता जोरदार रस्सीखेंच सुरु आहे. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत मातोश्रीवर जाऊन शिवसेना उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. चंद्रपुरात मदत न केल्यास परभणीत पाठिंबा काढू, अशी थेट भूमिका काँग्रेसनं घेतल्याचं वृत्त एबीपी माझानं सुत्रांच्या हवाल्यानं दिलं आहे. चंद्रपुरात सत्ता स्थापनेचा पेच कायम आहे. चंद्रपुरात सत्ता स्थापनेसाठी ३४ चा आकडा गाठणं गरजेचं आहे. काँग्रेसनं सर्वाधिक २७ जागा जिंकल्या आहेत. पण काँग्रेसमध्ये गटातटाचं राजकारण सुरु आहे. भाजपला २३ जागांवर यश मिळालं आहे. ठाकरेसेनेनं ६ जागा जिंकल्या आहेत. सत्ता स्थापनेसाठी काँग्रेसला ठाकरेसेनेचा पाठिंबा गरजेचा आहे. चंद्रपुरात काँग्रेसची कोंडी झालेली असताना परभणीत तशीच वेळ ठाकरेसेनेवर आली आहे. परभणी महापालिकेत एकूण ६५ जागा आहेत. पैकी २५ जागा जिंकून ठाकरेसेना सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. इथे बहुमतासाठी ३३ चा आकडा गाठणं गरजेचं आहे. परभणीत काँग्रेसचे १२ नगरसेवक आहेत. त्यामुळे इथे काँग्रेस किंगमेकर आहे. काँग्रेसच्या मदतीनं ठाकरेसेनेचा महापौर होऊ शकतो. त्यामुळे दोन महापालिकांमध्ये ठाकरेसेना आणि काँग्रेस सत्तेत येऊ शकते. परभणीत भाजपलाही १२ जागा मिळाल्या आहेत चंद्रपुरात मदत न केल्यास परभणीत पाठिंबा काढून घेऊ, असा इशारा काँग्रेसनं ठाकरेसेनेला दिल्याचं समजतं. चंद्रपुरात ठाकरेसेनेनं अपेक्षित सहकार्य न केल्यास काँग्रेसकडून धक्का दिला जाऊ शकतो. काँग्रेसच्या मदतीशिवाय ठाकरेसेनेचा महापौर परभणीत बसू शकत नाही, याची जाणीव काँग्रेसला आहे. त्यामुळेच चंद्रपुरात ठाकरेसेनेचं तोंड उघडण्यासाठी परभणीत त्यांचं नाक दाबण्याची खेळी काँग्रेसनं केली आहे. आता यावर ठाकरेसेना काय भूमिका घेणार याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.



# सहर शेखच्या आव्हानावर जितेंद्र आव्हाड यांची पहिली प्रतिक्रिया





**वृत्तसंस्था/ ठाणे**

एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांनी आव्हान दिल्यानंतर आज पहिल्यांदाच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड मुंब्र्यात आले. जितेंद्र आव्हाड यांच्या सत्काराचा कार्यक्रम आज मुंब्र्यात आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने ते आज मुंब्रा शहरात आले आहेत. त्यांचं कार्यकर्त्यांकडून जंगी स्वागत करण्यात आलं. कार्यकर्त्यांकडून प्रचंड घोषणाबाजी करुन शक्तीप्रदर्शन करण्यात आलं. यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी काही माध्यमांना प्रतिक्रिया दिली. त्यांनी सहर शेख यांच्या आव्हानावर प्रतिक्रिया दिली. तसेच जितेंद्र आव्हाड कार्यक्रमस्थळी आले तेव्हा कोण आया रे कोण आया शेर का शिकारी आया, अशी घोषणाबाजी कार्यकर्त्यांकडून करण्यात आली. याबाबतही त्यांना प्रश्न विचारण्यात आला. आजकाल गल्लीबोळात ही घोषणा असते, कोण आया कोण आया, शेर आहे. त्यामुळे आता कोण आया कोण आया शेर का शिकारी आया, अशी घोषणा केली जात आहे. हे नवीन पोरं कल्पक असतात. ही कल्पक पोरांची कल्पक घोषणा आहे. त्यामुळे त्याचा अर्थ तुम्हीच सममजून घ्या, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले यावेळी जितेंद्र आव्हाड यांना सहर शेख यांनी दिलेल्या आव्हानाबाबत प्रश्न विचारण्यात आला. मला काही सांगायचं नाही. लोकांचं आव्हान देणं हे काम असतं. त्यामुळे आपण त्यांच्या आव्हानांसाठी काम करत नाहीत. आपण मनाप्रमाणे करत असतो. हाथी चले अपनी चाल कुत्ते भोंके हजार, आपल्याला काही फरक पडत नाही, अशी प्रतिक्रिया जितेंद्र आव्हाड यांनी दिली. अशी एखादी लहान पोरगी मिश्किलपणे बोलते, तिच्या त्या वक्तव्याचा आणि बालिशपणाचा सोशल मीडियावर क्रेझ आहे. तिच्या वक्तव्याला खूप काही अर्थ नाहीय. माझी लहान पोरगी हसत-हसत चॉकलेट लाया असं बोलेल तर ते पण गाजेल. त्यामध्ये काही विषय नाही. बालिश आहे अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली.

# मामाच्या मुलाचं लग्न लागलं, घरी येताना कुटुंबावर काळाचा घाला

## पतीसह, पत्नी आणि मुलगीही ठार..




**कोल्हापूर :** जालना: जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील महाकाळ फाट्यावर छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर काल सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला आहे. भरधाव कंटेनरने २ दुचाकींना पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या या अपघातात दुचाकीवरील एकाच परिवारातील पती-पत्नी, मुलगी हे ठार झाले तर दुसऱ्या दुचाकीवरील पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत.यासंदर्भात अधिक माहिती अशी की, विकास अन्नासाहेब जाधव (वय २८) हे पत्नी साक्षी (वय २३) आणि मुलगा अथर्व (वय ४ सर्व रा. रोहीलागड ता. अंबड, ह. म. शहानगर चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर) हे उमापुर (ता. गेवराई, जि. बिड) येथे मामाच्या मुलाचे लग्न लावून दुचाकीने (एमएच २०-एचसी ३०१३) घराकडे जात होते. दरम्यान, शहागड-वडीगोद्री रस्त्यावर महाकाळा फाट्याजवळ भरधाव कंटेनरने (एनएल ०१-जी९३२२) समोर चाललेल्या दोन दुचाकींना पाठीमागून जोराची धडक दिली. यावेळी कंटेनरने दूरपर्यंत या दोन्हीही दुचाकींना फरफटत नेल्या. अपघातस्थळी उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी व काही वाहनचालकांनी वाहन थांबवत या कंटेनरला थांबवले, मात्र तोपर्यंत कंटेनर चालकाने घटनास्थळावरून पोबारा केला होता. यावेळी नागरिकांनी दुचाकीवरील जखमींची पाहणी केली असता तिघेही मृत अवस्थेत आढळून आले. नातेवाईकांच्या म्हणण्यानुसार मयत साक्षी जाधव या गरोदर होत्या. दुसऱ्या दुचाकीवरील (एमएच १६-सीएल ९७३७) संतोष बनसोडे (वय २९), त्यांची पत्नी मोनिका (वय २५, रा. वळदगाव, जि. छत्रपती संभाजीनगर) हे या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मयत साक्षी जाधव आणि अथर्व यांच्या मृतदेहाचे पाचोड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. तसंच मयत विकास जाधव यांच्यासह जखमींना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, या भीषण घटनेनंतर राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. घटनास्थळी गोंदी ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण हवाले, जमादार रामदास केंद्रे, दिपक भोजने आणि महाकाळा येथील ग्रामस्थांनी कंटेनरखालील मयतांना जेसीबीच्या साह्याने बाहेर काढण्यासाठी मदत केली. तसेच खोळंबलेली वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना एक ते दीड तास कसरत करावी लागली आहे. काही क्षणातच एक हसतं खेळतं कुटुंब उद्ध्वस्त झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## दीड वर्षांच्या लेकीला विष दिलं अनब पती-पत्नीने आयुष्य संपवलं

**रांची :** आपल्या दीड वर्षांच्या लेकीला आपल्याच हाताने विष देत तिचा जीव घेतला. त्यानंतर पती – पत्नीनेही विष प्राशन करत आपल्या आयुष्याची अखेर केल्याची दु:खद घटना समोर आली आहे. ही भयंकर घटना झारखंडमधील धनबाद येथील जोगता पोलीस स्टेशन परिसरात घडल्याची माहिती समोर आली आहे. येथील एकाच कुटुंबातील तिघांच्या मृत्यूने परिसरात एकच खळबळ माजली आहे.धनबाद येथील एकाच कुटुंबातील तिघे पती, पत्नी आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी यांनी विष प्राशन करून आपलं आयुष्य संपवलं आहे. या पती-पत्नीने आपला जीव देण्यापूर्वी आपल्या मुलीला विष दिल्याचं सांगितलं जात आहे. मृतांची ओळख राजा मियाँ, त्यांची पत्नी अमिना परवीन आणि त्यांची दीड वर्षांची मुलगी मायरा परवीन अशी झाली आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, कौटुंबिक वादातून या पती-पत्नीने लेकीला विष देत आयुष्याची अखेर केल्याचं वृत्त आहे. स्थानिक रहिवाशांकडून माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तिघांनाही तातडीने धनबादच्या एनएमसीएचमध्ये नेले. मात्र, तोपर्यंत खूप उशिर झालेला होता.

## झुंड चित्रपटातील अभिनेता रवीसिंग छेत्री याचा निर्घृण खून



**नागपूर :** नागराज मंजुळे यांच्या 'झुंड'चित्रपटातील बाबू छत्री या भूमिकेने प्रकाश झोतात आलेला अभिनेता प्रियांशू उर्फ बाबू रवीसिंग छेत्री ऊर्फ बाबू छत्री (वय २१ रा. लुंबिनीनगर) याचा निर्घृण खून करण्यात आला. ही थरारक घटना जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नारा परिसरातील ओमसाईनगर येथील निर्माणाधीन इमारतीत घडली. या घटनेनं पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. पैशाच्या वादातून मित्रानेच त्याला संपिवल्याचं तपासादरम्यान पुढं आलं आहे. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकरी बाबूच्या मित्राला अटक केली. ध्रुव उर्फ द्रुप शाहू (वय २०, रा. नारा), असं अटकेतील मारेकऱ्याचं नाव आहे. बाबू व ध्रुवला गांजा व दारूचं व्यसन आहे. बाबू याच्याविरूद्ध चोरीचे गुन्हे दाखल आहेत. लोहमार्ग पोलिस दलातही त्याच्याविरूद्ध गुन्हे दाखल आहेत.

ध्रुव व बाबूमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पैशासाठी वाद सुरू होता. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये हाणामारीही झाली. या हाणामारीनंतर बाबू आपल्याला ठार मारेल, अशी भीती ध्रुव याला होती. काल मंगळवारी रात्री बाबू हा दारू पिवून घरी झोपला होता. रात्री ध्रुव त्याच्या घरी आला. त्याला उठविले. त्यानंतर ध्रुव हा मोटारसायकलने बाबूला घेऊन निमर्णाधीन इमारतीत गेला.

तेथे दोघांनी दारू व गांजा प्यायला. त्यानंतर दोघांमध्ये पैशावरून वाद झाला. वाद विकोपाला गेला. संतप्त ध्रुवने चाकूने बाबूच्या शरीरावर वार केले. बाबू गंभीर जखमी झाला. ध्रुव तेथून पसार झाला. दरम्यान, परिसरातील नागरिकांना बाबू हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. नागरिकांनी पोलिसांना माहिती देत त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. डॉक्टरांनी तपासून बाबूला मृत घोषित केले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून ध्रुव याचा शोध सुरू केला. ध्रुव हा नारा परिसरातील झुडपात मद्यधुंद अवस्थेत पोलिसांना दिसला. पोलिसांनी त्याला अटक केली.

## गाडीला कट लागल्याने एकाला संपवलं; आरोपींसाठी पोलिसांनी सापळा रचला अनब..

**नागपूर :** गाडीचा कट लागल्याने दोघांनी मारहाण करून योगेश व्यंकटराव झोडे रा. देवळी गुजर याची हत्या केली. ही घटना बुटीबोरीतील कोलार येथे घडली. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून दोन मारेकऱ्यांना अटक केली. आदित्य वीरेंद्र बेले (वय २८ रा. दसरा रोड, महाल) व हिमांशू रमेशचंद्र गुप्ता (रा.गणेशनगर, न्यू कळमना), अशी अटकेतील मारेकऱ्यांची नावे आहेत. योगेश हा मालवाहू वाहनाने श्रमिकांची ने आण करण्याचे काम करायचा.

३० सप्टेंबरला सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास तो गाडीने बुटीबोरीकडे येत होता. कोलार परिसरात योगेशच्या गाडीचा कट आदित्यचा गाडीला लागला. दोघांनी त्याला थांबविले. त्याला जबर मारहाण केली व पसार झाले. नागरिकांनी त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी बुटीबोरी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. आदित्य व हिमांशूने मारहाण




केल्यानं त्याचा मृत्यू झाल्याचं समोर आलं. बुटीबोरी पोलिसांनी मंगळवारी खुनाचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आदित्य व हिमांशूची १० ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

## दोघांचं एकाच मुलीवर प्रेम; धारदार शस्त्राने एकाला संपवलं

**वर्धा :** वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात प्रेमप्रकरणातून उद्भवलेल्या वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना आर्वी शहराच्या मध्यवर्ती गांधी चौकात घडली असून, या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत व्यक्तीचं नाव सलीम सबदर शा (वय ३०, रा. संजय नगर, आर्वी) असं असून, पोलिसांनी निखिल बुरे (रा. हरदोली) या तरुणास अटक केली आहे.प्राथमिक माहितीनुसार, सलीम आणि निखिल या दोघांमध्ये एका तरुणीवरून गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता. दोघांनाही तीच मुलगी आवडत असल्यानं त्यांच्यामध्ये वैर निर्माण झालं होतं. याच प्रेम संबंधातून निर्माण झालेल्या वादाचे रूप काल थेट हाणामारीत बदललं. दुपारच्या सुमारास गांधी चौकात सलीम आणि निखिल यांच्यात पुन्हा वाद झाला. वाद चिघळताच निखिलने आपल्याजवळील धारदार शस्त्राने सलीमवर वार केले. या हल्ल्यात सलीम गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केलं. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केलं.घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आरोपी निखिल बुरे याला अल्पावधीतच ताब्यात घेण्यात आलं असून, त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.



या घटनेमुळे आर्वी शहरात संतापाची लाट उसळली आहे. गांधी चौक परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण असून, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी परिसरात बंदोबस्त वाढवला आहे. प्रेमसंबंधातून झालेल्या या हत्येनं आर्वी शहर हादरलं असून, पुन्हा एकदा युवकांमधील अस्थिर भावनांचा आणि रागाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# टीम इंडियाने उडवला न्यूझीलंडचा धुव्वा

## पहिल्या टी-२० सामन्यात भारताचा ४८ धावांनी विजय; अभिषेकची ८४ धावांची खेळी





**नागपूर/वृत्तसंस्था :** न्यूझीलंडविरुद्ध पहिल्याच टी २० सामन्यात भारताने ४८ धावांनी दणदणीत विजय मिळवला. अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर किवींना धूळ चारत टीम इंडियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी मिळाल्यावर २० षटकांत भारताने ७ गडी गमावून २३८ धावांचा डोंगर उभा केला. ही न्यूझीलंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील भारताची आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या आहे. विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना किवीज संघाला मात्र ७ बाद १९० धावापर्यंत मजल मारता आली. उभय संघातील दुसरा सामना दि. २३ रोजी रायपूर येथे होईल.

२३९ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडने जोरदार प्रयत्न केले. ग्लेन फिलिप्सने धमाकेदार खेळी करताना ४० चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकरासह सर्वाधिक ७८ धावा केल्या. पण, तो १४ व्या षटकात बाद झाला. तो सोडला, तर बाकी कोणताही खेळाडू फार काळ तग धरू शकला नाही. ज्यामुळे किवी फलंदाजांना निर्धारित षटकांत केवळ १९० धावांपर्यंतच मजल मारता आली. न्यूझीलंडने शेवटपर्यंत संघर्ष केला, पण वाढत्या धावगतीच्या दबावामुळे त्यांना ४८ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. चॅपमनने ३९, डॅरिल मिचेलने २८ तर सँटनरने नाबाद २० धावा केल्या.

न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. भारताकडून अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी डावाची सुरुवात केली. सॅमसनने आक्रमक सुरुवात केली होती. पण तो दुसऱ्या षटकात ७ चेंडूत १० धावा करून बाद झाला. दोन वर्षांनी पुनरागमन करणारा इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर मैदानात उतरला. त्याने पहिल्याच चेंडूवर चौकार मारत इरादा स्पष्ट केला होता. पण आक्रमक खेळण्याच्या प्रयत्नात जेकब डफफीने त्याला ८ धावांवर मार्क चॅपमनच्या हातून झेलबाद केले. २७ धावांत २ विकेट गमावल्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने अभिषेकची चांगली साथ दिली. एका बाजूने अभिषेक आक्रमक खेळत असताना दुसरी बाजू सूर्यकुमारने सांभाळली होती. सूर्यानेही काही चांगले शॉट्स खेळले. यादरम्यान अभिषेकने २२ चेंडूतच त्याचे अर्धशतक पूर्ण केले. हे त्याचे ७ वे आंतरराष्ट्रीय अर्धशतक होते. अभिषेक आणि सूर्यकुमार या दोघांनी ९९ धावांची भागीदारी केली. मात्र सँटनरने ११ व्या षटकात सूर्यकुमारला बाद केले. त्याने २२ चेंडूत ४ चौकार आणि १ षटकारासह ३२ धावा केल्या. यानंतर शतकाच्या दिशेने वाटचाल करत असलेला अभिषेक आक्रमक शॉट मारण्याच्या प्रयत्नात १२ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर काईल जेमिसनच्या हातात झेल देत बाद झाला. त्याने ३५ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकारांसह ८४ धावा तडकावल्या. अभिषेक बाद झाल्यानंतर हार्दिक पंड्याने २५ धावांचे योगदान दिले तर शिवम दुबे ९ धावा करत माघारी परतला. यानंतर नंतर रिंकू सिंगने जबाबदारी हाती घेतली. त्याने २० चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ४४ धावा झोडपल्या. यामुळे भारताने २० षटकांत ७ बाद २३८ धावांचा डोंगर उभा केला. अर्शदीप ६ धावांवर नाबाद राहिला.

■ अभिषेकने या खेळीदरम्यान युवराज सिंगचा विक्रम मोडला. अभिषेकने युवराजला टी-२० मधील षटकारांबाबत मागे टाकले. युवराजला मागे टाकण्यासाठी अभिषेकला या सामन्याआधी २ षटकारांची गरज होती. अभिषेकने ३५ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकार लगावले. यासह अभिषेकने युवराजला टी-२० सिक्सबाबत मागे टाकले. आता त्याच्या नावे ८३ षटकारांची नोंद आहे. तर युवराजने ५८ सामन्यांमध्ये ७४ षटकार लगावले होते. याशिवाय, अभिषेक न्यूझीलंडविरुद्ध एकाच टी-२० सामन्यात ८ किंवा त्यापेक्षा अधिक षटकार मारणारा जगातील तिसरा, तर भारताचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. याआधी रिचर्ड लेवी आणि कायरन पोलार्ड यांनी असा पराक्रम केला आहे. रिचर्डने २०१२ मध्ये हॅमिल्टनला झालेल्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध १३ षटकार मारले होते. पोलार्डने २०२० मध्ये न्यूझीलंडविरुद्ध टी-२० सामन्यात ८ षटकार मारले होते.

## बीसीसीआयला आयपीएलसाठी २७० कोटी रुपयांचा प्रायोजकत्व करार




**दिल्ली :** बीसीसीआयने २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगपूर्वी गुगलच्या जेमिनी या एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) प्लॅटफफॉर्मकडून २७० कोटी रुपयांचा आकर्षक प्रायोजकत्व करार मिळवला आहे.

जेमिनीचा प्रतिस्पर्धी चॅटजीपीटी सध्या सुरू असलेल्या महिला प्रीमियर लीगच्या प्रायोजकांपैकी एक आहे. हा करार तीन वर्षांसाठी आहे आणि तो आयपीएलच्या जागतिक आकर्षणाला अधिक बळकटी देतो, असे बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. गेल्या वर्षी जेंव्हा भारत सरकारने ड्रीम-११ सारख्या रिअल मनी गेमिंग प्लॅटफफॉर्मवर बंदी घातली, तेंव्हा बीसीसीआयला नवीन जर्सी प्रायोजक शोधावा लागला होता. अखेरीस, अपोलो टायर्सने ड्रीम ११ ची जागा घेतली आणि ५७९ कोटी रुपयांना जर्सी प्रायोजकत्वाचे हक्क मिळवले. टाटा समुहाकडे जगातील सर्वात मोठी टी-२० लीग असलेल्या आयपीएलचे शीर्षक प्रायोजकत्वाचे हक्क आहेत. जेमिनीसोबतचा हा नवीनतम प्रायोजकत्व करार भारतीय क्रिकेटमधील एआय प्लॅटफफॉर्मची वाढती आवड दर्शवतो. गेल्या नोव्हेंबरमध्ये जेंव्हा डब्ल्यूपीएलसोबत चॅटजीपीटीच्या संबंधाची घोषणा झाली होती, तेंव्हा बीसीसीआयचे सचिव देवजित सायकिया यांनी या भागीदारीच्या महत्त्वाविषयी सांगितले होते. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स, उत्पादन आणि पेय पदार्थांमधील जागतिक कंपन्यांपासून ते विश्वासार्ह भारतीय ग्राहक ब्रँड्सपर्यंत, या भागीदारीचे मिश्रण चाहत्यांच्या अनुभवाला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

## साबालेन्का, अल्कारेझ, स्विटोलिनाची आगेकूच

### कोको गॉफ, व्हेरेव्ह, रुबलेव्ह, मेदवेदेव्हही तिसऱ्या फेरीत, राडुकानू पराभूत

**मेलबर्न/वृत्तसंस्था :** स्पेनचा २२ वर्षीय टेनिसपटू कार्लोस अल्कारेझ, रशियाचा डॅनील मेदवेदेव्ह, बेलारुसची आर्यना साबालेन्का, अमेरिकेची कोको गॉफ, अलेजान्ड्रो डेव्हिडोविच फोकिना, कॅनडाची किशोरवयीन व्हिक्टोरिया एम्बोको, रशियाचा आंद्रे रुबलेव्ह, अलेक्झांडर व्हेरेव्ह, एलिना स्विटोलिना यांनी ऑस्ट्रेलिया ओपन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत तिसरी फेरी गाठली तर ब्रिटनच्या एम्मा राडुकानूला पराभवाचा धक्का बसला. चौथ्या दिवशीही प्रेक्षकांनी विक्रमी गर्दी केली होती.



जागतिक अग्रमानांकित कार्लोस अल्कारेझने जर्मनीच्या ३४ वर्षीय यानिक हन्फमनवर ७-६ (७-४) ६-३, ६-२ असा पराभव केला. पहिल्या सेटमध्ये सुरुवातीला अल्कारेझ १-३ असा मागे पडला होता. पण नंतर त्याने हळूहळू पकड मिळिवत ७९ मिनिटे चाललेला पहिला गेम जिंकला आणि नंतरचे दोन सेट्स सहज जिंकत तिसरी फेरी गाठली. या स्पर्धेत अल्कारेझला आजवर उपांत्यपूर्व फेरीच्या पुढे मजल मारता आलेली नाही. त्याची पुढील लढत फ्रान्सच्या कोरेन्टिन मुटेटविरुद्ध होईल. या स्पर्धेची तीनवेळा अंतिम फेरी गाठलेल्या रशियाच्या मेदवेदेव्हला विजय मिळिवण्यासाठी चार सेट्सचा संघर्ष करावा लागला. फ्रान्सच्या क्वेनिटन हॅलीसवर त्याने ६-७ (७-९), ६-३, ६-४, ६-२ अशी मात केली.

पुरुष एकेरीच्या अन्य सामन्यांत १३ व्या मानांकित आंद्रे रुबलेव्हने जेमी फारियाचा ६-४, ६-३, ४-६, ७-५, १९ व्या मानांकित टॉमी पॉलने थियागो ऑगस्टिन तिरान्टचा ६-३, ६-४, ६-२, अलेक्झांडर बुबलिक, लीयर्नर तिएन, कॅमेरॉन नोरी यांनीही आगेकूच केली. डेव्हिडोविच फोकिनाने पाच सेट्सच्या झुंजीत अमेरिकेच्या रीली ओपेल्कावर ६-३, ७-६ (७-३), ५-७, ४-६, ६-४ अशी मात केली. जर्मनीच्या अलेक्झांडर व्हेरेव्हने आगेकूच करताना पावसाचा अडथळा बाजूला सारत अलेक्झांडर मुलेरवर ६-३, ४-६, ६-३, ६-४ अशी मात केली. ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्स डी मिनॉरने हमद मेदेडोविचला ६-७ (५-७), ६-२, ६-२, ६-१ असे हरविले. त्याची पुढील लढत फ्रान्सेस टायफोशी होईल. टायफोने फ्रान्सिस्को कॉमेसानाचा ६-४, ६-३, ४-६, ६-२ असा पराभव केला.

महिला एकेरीत जागतिक अग्रमानांकित आर्यना साबालेन्काने चीनच्या बाय झुओझुआनचा ६-३, ६-१ असा पराभव केला. साबालेन्काने २०२३ व २०२४ मध्ये ही स्पर्धा जिंकली होती तर मागील वर्षी ती उपविजेती ठरली होती. तिची पुढील लढत ॲनास्तेसिया पोटापोव्हाशी होईल. पोटापोव्हाने माजी अमेरिकन ओपन चॅम्पियन एम्मा राडुकानूला ७-६ (७-३), ६-२ असा पराभवाचा धक्का दिला. तिसऱ्या मानांकित कोको गॉफने सर्बियाच्या ओल्गा डॅनिलोविचचा ६-२, ६-२ असा पराभव करून तिसरी फेरी गाठली. तिची लढत तिचीच देशवासी हेली बाप्टिस्टशी होईल. युवा खेळाडू मायरा ॲन्ड्रीव्हा, व्हिक्टोरिया एम्बोको व इव्हा जोविच यांनी ही तिसरी फेरी गाठली. एम्बोकोने अमेरिकेच्या कॅटी मॅकनालीचा ६-४, ६-३ असा पराभव केल तर १२ व्या मानांकित एलिना स्विटोलिनाने लिन्डा क्लिमोविकोव्हावर ७-५, ६-१ अशी मात केली.

# मोठ्या प्रोडक्शन हाऊसचा मराठी अभिनेत्रीला आला धक्कादायक अनुभव..



**मुंबई :** मराठी अभिनेत्री विभावरी देशपांडेनं अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये उल्लेखनीय भूमिका साकारल्या आहेत. अशातच आता अभिनेत्रीनं केलेली पोस्ट चर्चेत आली आहे. एका हिंदी प्रोजेक्टसाठी विभावरीची निवड करण्यात आलेली. पण, तिला न कळवताच सिनेमाचं शूटिंग पूर्ण झालं, असं अभिनेत्रीनं म्हटलं आहे.विभावरी देशपांडेनं सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लिहिलं की, 'गेल्या वर्षी एका प्रसिद्ध दिग्दर्शकाच्या हिंदी प्रोजेक्टमध्ये माझ्यासाठी एका भूमिकेची निवड झाली होती. मला ऑडिशनशिवाय ही भूमिका देऊ करण्यात आली होती. माझी दिग्दर्शकाशी मनमोकळ्या गप्पाही झाल्या होत्या. तो चित्रपट पुढे ढकलला गेला. डिसेंबर २०२५ मध्ये मला सांगण्यात आलं की, चित्रपटाचं शूटिंग सुरू होणार आहे आणि पुढीची चर्चा करण्यासाठी प्रोडक्शन हाऊसमधून मला फोन येईल. ते प्रोडक्शन हाऊस खूप मोठं आणि प्रतिष्ठित आहे. पण मला तो फोन कधीच आला नाही. दुसऱ्या दिवशी माझ्या ऐकण्यात आलं की, चित्रपटाचं अर्ध शूटिंग आधीच पूर्ण झालंय!'रिप्लेस करणं ही काही नवीन किंवा धक्कादायक गोष्ट नाही. पण साधी माहितीही न देणं हे खरोखरच वाईट आणि अव्यावसायिक आहे. मला याची पूर्ण जाणीव आहे की, मी 'स्टार' नाही आणि मी कोणतेही निर्णय घेत नाही. मला हे देखील माहित आहे की, अभिनय हे स्वतंत्र काम आहे. लिखन आणि दिग्दर्शन इत्यादी कामंही तशीच आहेत, पण अभिनय हे त्याहूनही अधिक आहे, जोपर्यंत तुम्ही मोठे स्टार होत नाहीं पण हे अनादरपूर्ण आणि अव्यावसायिक आहे. आपण सर्वजण नेहमीच अपमान आणि दुःख पचवत असतो. आपण म्हणतो की, 'इंडस्ट्री अशीच चालते'. आपण पुढे जातो आणि प्रत्येक अपमानाने अधिक मजबूत होतो. पण एक कलाकार, तो लहान असो वा मोठा, काही प्रमाणात आदरास पात्र असतो. प्रत्येकजण असतो.'आपण अनादर, असंवेदनशीलता आणि अव्यावसायिक वर्तनाला सामान्य तर बनवत नाही आहोत ना? साधं आणि सोपं 'संवाद' अपेक्षित करणं ही काही मोठी मागणी आहे का? मी कोणाची नावं घेणार नाही. कारण मला ऑडिशन्स किंवा काम मिळणार नाही याची भीती वाटतं असं नाही. मला विश्वास आहे की, मला काम मिळेल. पण ही पोस्ट कोणाची बदनामी करण्यासाठी नाही. हे फक्त माझे विचार आहेत. मी फेसबुकवर क्वचितच व्यक्त होते, पण मला हे सांगावंसं वाटलं. मला खात्री आहे की, माझ्या अनेक सहकाऱ्यांनी आणि मित्रांनी यातून आणि याहून वाईट अनुभवातून गेले आहेत. बाकी सगळं फर्स्ट क्लास आहे!' असं अभिनेत्रीनं शेवटी म्हटलं आहे.

## प्रजासत्ताक दिनाला बॉर्डर २ ची बक्कळ कमाई, पुष्पा, जवान, टाइगर'लाही पछाडलं

**मुंबई :** सध्या सर्वत्र फक्त 'बॉर्डर २' चा बोलबाला पाहायला मिळत आहे. २६ जानेवारीला (प्रजासत्ताक दिन) चित्रपटाने रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली आहे. सनी देओल 'बॉर्डर २' चित्रपट २३ जानेवारी २०२६ ला थिएटरमध्ये रिलीज झाला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक अनुराग सिंह हे आहेत. या चित्रपटात सनी देओल, वरुण धवन, परमवीर सिंह चीमा, दिलजीत दोसांझ, अहान शेट्टी, सोनम बाजवा, मेधा राणा आणि मोना सिंग झळकले आहेत. 'बॉर्डर २' हा १९९७ ला रिलीज झालेल्या 'बॉर्डर' चित्रपटाचा सीक्वल आहे.

'बॉर्डर २' चित्रपटाने रिलीजच्या पहिल्या दिवशी ३० कोटी रुपये, दुसऱ्या दिवशी ३५ कोटी रुपये, तिसऱ्या दिवशी ५४.५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. 'बॉर्डर २' चित्रपटाने २६ जानेवारी





प्रजासत्ताक दिनाला बक्कळ कलेक्शन केले आहे. रिपोर्टनुसार,'बॉर्डर २' ने चौथ्या दिवशी ५९ कोटी रुपयांची कमाई केली आहे. ज्यामुळे चित्रपटाचे एकूण कलेक्शन १८० कोटी रुपये झाले. मीडिया रिपोर्टनुसार, 'बॉर्डर २'ने जगभरात २०० कोटींच्यावर कमाई केली आहे. चार दिवसांत २३९.२ कोटी रुपये कमावले आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, बॉर्डर २ चित्रपट पहिल्या सोमवारी सर्वाधिक कम ाई करणारा चित्रपट ठरला. 'बॉर्डर २'ने रिलीजच्या पहिल्या सोमवारी विक्रमी कमाई करून इतिहास रचला. त्याने 'पुष्पा २', 'छावा', धुरंधर, पठाण आणि जवान यांसारख्या मोठ्या चित्रपटांना मागे टाकले आहे.

## 'कच्चा बदाम' फेम अंजली अरोराच्या बॉयफ्रेंड पोलिसांच्या ताब्यात



**मुंबई :** सोशल मीडियावर 'कच्चा बादाम' गाण्यावर व्हायरल झालेली अंजली अरोराचा बॉयफ्रेंड आकाश संसनवाल याला उत्तर प्रदेशातील मेरठ येथे पोलिसांनी अटक केली आहे. परतापुर काशी टोल प्लाझा परिसरात पोलिसांनी केलेल्या तपासणीदरम्यान आकाशच्या गाडीवर भारतीय संसद - पूर्व सदस्य (एु-चझ) असा खोटा स्टीकर लावला होता. या प्रकरणी पोलिसांनी फसवणूकीसह इतर संबंधित कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे.

दिल्ली नंबर असलेली स्कॉर्पियो कार संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी ती थांबवली. वाहनावर लावलेला एक्स-एम पी स्टीकर अधिकृत नसल्याचे तपासात स्पष्ट झाले. चौकशीदरम्यान हा स्टीकर नियमबाह्य आणि फसवणुकीच्या उद्देशाने वापरण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी आकाश संसनवालला ताब्यात घेतले. त्यानंतर संबंधित कार सीज करण्यात आली. आकाशला न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणात फक्त आकाशच नव्हे तर इतर चार जणांनाही अटक करण्यात आली आहे. टोल प्लाझावर तपासणी सुरू असताना काही वाहनचालकांनी पोलिसांना चकवा देण्याचा किंवा टोल न देता पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याचेही समोर आले. मात्र पोलिसांनी सतर्कता दाखवत दोन स्कॉर्पियो आणि दोन थार अशा एकूण चार गाड्या अडवून तपासासाठी ताब्यात घेतल्या. या सर्व वाहनांची सखोल चौकशी सुरू आहे.

# 'मुलगी ६-७ महिन्यांची असताना तिला फिट यायची, तोंडातून फेस यायचा अनब' कारंडेनं सांगितला किस्सा

**मुंबई :** सुप्रसिद्ध मराठी अभिनेता सागर कारंडे ' बिग बॉस मराठी ६ ' मध्ये सहभागी झाला असून या शोमधून तो प्रेक्षकांचं मनोरंजन करतोय. यापूर्वी सागरने अनेक नाटकांमध्ये काम केलं आहे. त्याचबरोबर 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमातूनही सागरला प्रचंड लोकप्रियता मिळाली. मात्र, सागरचा हा प्रवास सोपा नव्हता. याबद्दल अभिनेत्यानं एका मुलाखतीमध्ये भाष्य केलं आहे. सागर कारंडेनं इंजिनिअरिंग केलं असून त्याला अभिनयाची आवड असल्यामुळं त्यानं नोकरी सोडून या क्षेत्रात येण्याचा निर्णय घेतला. अभिनेत्याला घरच्यांनी पाठींबा दिला आणि त्यांच्याच सपोर्टमुळे त्यानं इंडस्ट्रीत नाव कमावलं. इंडस्ट्रीमध्ये मित्रच नाहीत, असंही सागर कारंडेनं सांगितलं आहे.सागर कारंडेनं 'राजश्री मराठी'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्याच्या कठीण काळाबद्दल सांगितलं. सागर कारंडे म्हणाला की, 'माझं अरेंज मॅरेज झालंय. मी आणि माझ्या बायकोने आम्ही एकमेकांना पहिल्याच भेटीत पसंत केलेलं. त्यानंतर एक दिवस मला तिचा



फोन आला, भेटूया म्हणून. मी तिला माझ्या नाटकाची रिहर्सल होती, तिथे बोलावलं. थोडा वेळ तिने बघितलं, काय चाललंय. मला तिने विचारलं, 'हे काय आहे?' हा प्रश्न ऐकताच माझ्या पायाखालची जमीन सरकली. आता आयुष्यभर हिला काय सांगायचं, मी काय करतोय. यापूर्वी तिनं कधीच मराठी नाटक नव्हतं बघितलं. ती म्हणाली, तुम्हाला हवं ते करा, करा..पण पूर्ण करा.'बायकोने चांगल्या पद्धतीने घर सांभाळलं, मला सांभाळलं. मला मुलगी झाली, त्यानंतर एक ६-७ महिन्यात तिला ताप यायचा, फिट्स यायच्या, तोंडातून फेस यायचा. डॉक्टरांनी सांगितलेलं, तिचा ताप वाढू देऊ नका, काही झालं तरी. सोनोग्राफी करायला सांगितलेली. सोनोग्राफीसाठी १००० रुपये नव्हते. त्यादिवशी मला स्वतःचा खूप राग आलेला. म्हटलं, नालायक आहेस तू, बाप होण्याची लायकी नाहीये. त्यादिवशी शपथ घेतली, माझ्या बायकोला, मुलीला आणि घरच्यांना कसली कमी पडू देणार नाही. शेवटी बायकोने सांभाळलं.' असं सागरने पुढे सांगितलं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेगाव येथे भव्य पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**




जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या तरुण-तरुणींसाठी एक मोठी आनंदाची बातमी आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (मॉडेल करिअर सेंटर), बुलढाणा आणि माऊली कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी २ फेब्रुवारी २०२६ (सोमवार) रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये देशातील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून थेट मुलाखतीद्वारे रिक्त पदे भरली जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने: भारत फोर्ज, पुणे मरीन इलेक्ट्रिकल, मुंबई बी. व्ही. जी. इंडिया, पुणे कोअर प्रोजेक्ट इंजिनीअर्स, अमरावती यांसह ३३ पेक्षा अधिक दिग्गज कंपन्यांचा समावेश आहे. १०वी, १२वी, , डिप्लोमा (पदविका) आणि सर्व शाखांचे पदवीधर व तत्सम शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांना हा मेळावा पूर्णपणे निःशुल्क (मोफत) आहे.मेळाव्याचा तपशील दिनांक: २ फेब्रुवारी २०२६ (सोमवार) ठिकाण: माऊली कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, खामगाव-शेगाव रोड, शेगाव. इच्छुक उमेदवारांनी खालील पोर्टलवर आपली नोंदणी करणे आवश्यक आहे:राज्य शासन पोर्टल: केंद्र शासन पोर्टल:.. बुलढाणा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त, ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

# जिल्हा क्रीडा संकुलात राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल स्पर्धांचे आयोजन...

**जनसंचलन/ बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विदर्भ रिजन शुटींगबॉल असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने दि. २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथे राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये १७ वर्षांखालील मुले व मुली सहभागी होणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी १० मुले व १० मुली सहभागी होतील. तसेच प्रत्येक विभागातून पुरुष व महिला संघ व्यवस्थापक, तज्ज्ञ पंचाधिकारी, स्वयंसेवक आदींची उपस्थिती राहणार आहे. स्पर्धांचा उद्घाटन समारंभ दि. २९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे मान्यवर अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषदेचे पदाधिकारी, शिवछत्रपती पुरस्कारार्थी, अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक, विदर्भ रिजन शुटींगबॉल संघटनेचे पदाधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मुलींच्या संघांसाठी नवीन इमारतीत तर मुलांच्या संघांसाठी जुन्या इमारतीत निवास व्यवस्था करण्यात आली आहे. भोजन व्यवस्था देखील जिल्हा क्रीडा संकुल परिसरातच करण्यात येणार आहे. संकुल परिसरात शुटींगबॉलचे दोन अद्ययावत मैदाने तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्पर्धा आयोजनासाठी विविध समित्या जसे की आयोजन समिती, तक्रार निवारण समिती, उद्घाटन समिती, तांत्रिक समिती, मैदान व्यवस्था, भोजन, निवास, वैद्यकीय, प्रसिद्धी व स्वच्छता समिती सक्रियपणे कार्यरत आहेत. निवास व्यवस्था व संकुल परिसराची स्वच्छता पूर्ण झाली असून निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, भोजन पासेस व इतर दस्तऐवजांचे काम अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, दि. २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत स्पर्धा असल्याने सैन्य व पोलीस भरती सरावासाठी जिल्हा क्रीडा संकुलातील मैदाने तात्पुरती बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या स्पर्धांचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे तसेच स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांनीही स्पर्धा पाहण्यासाठी नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# राष्ट्रीय नाट्य विद्यालयात जिल्ह्यातून पहिला प्रवेश असलेल्या डॉ. गिरीबाला सोनुने यांचा अक्षरदेह तर्फे सत्कार...



**जनसंचलन/बुलडाणा**

कला क्षेत्रातील सर्वोच्च शासकीय संस्था असलेल्या एनएसडी अर्थात राष्ट्रीय नाट्य विद्यालयात प्रवेश निश्चित झालेल्या जिल्ह्यातील पहिल्या व्यक्ती डॉ. गिरीबाला सोनुने यांचा अक्षरदेह नाट्यकला संस्थेतर्फे समारंभपूर्वक सत्कार करण्यात आला. महाराष्ट्रातून फक्त दोघांचीच निवड झाली असून त्यामध्ये डॉ. गिरीबाला यांचा समावेश आहे.

सुप्रसिद्ध छायाचित्रकार प्रशांत सोनोने यांची कन्या असलेल्या डॉ. गिरीबाला सोनुने यांनी वैद्यकीय पदवी प्राप्त केल्यानंतर व्यवसाय न करता राष्ट्रीय नाट्य विद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न केला. मात्र दरवर्षी देशभरातून केवळ २० विद्यार्थ्यांची निवड एनएसडीतर्फे करण्यात येते. अत्यंत कठीण प्रवेश प्रक्रियेतून स्वतःला सिध्द करीत डॉ. गिरीबाला यांचा प्रवेश निश्चित झाला. महाराष्ट्रातून निवड झालेल्या दोघांपैकी त्या एक आहेत तर जिल्ह्यातील पहिल्याच व्यक्ती ठरल्या आहेत. नाट्यक्षेत्रासाठी अभिमानास्पद असलेल्या या घटनेबद्दल डॉ. गिरीबाला सोनुने यांचा अक्षरदेह नाट्यकला संस्थेतर्फे २९ डिसेंबर रोजी समर्थ एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक सुरेश साबळे हे होते तर चित्रपट अभिनेते गणेश देशमुख व कवी प्रेषित सिध्दभट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. नटराज पूजन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्याहस्ते आईवडीलांसह डॉ. गिरीबाला सोनुने यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सिने अभिनेते गणेश देशमुख यांनी नाटक ही सतत शिकत राहण्याची प्रक्रीया असते, प्रत्येक प्रयोग नवे काही शिकवत असतो असे सांगून नाटक समजून घेणे हे खूप महत्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. कवी प्रेषित सिध्दभट्टी यांनी आज आपल्या कडे पेशंट कमी पण डॉक्टर गल्लोगल्ली असंख्य आहेत.अशावेळी भौतिकता आणि कला यामध्ये जेव्हा संघर्ष होतो, तेव्हा अनेक कलाकार हरतात व भौतिकतेला प्राधान्य देतात. मात्र डॉ. गिरीबाला यांनी निवडलेल्या मार्ग कलेला प्राधान्य देणारा असल्याने तो महत्वपूर्ण ठरतो, असे मत व्यक्त केले.प्रशांत सोनोने यांनी समाज व व्यवस्था परिवर्तनाचे सर्वात सशक्त माध्यम नाटक व सिनेमा असल्याचे सांगून सर्वांसाठी सुंदर जगनिर्मीतेचे स्वप्न केवळ कलाकारच प्रत्यक्षात उतरवू शकतो असा विश्वास व्यक्त केला.चंद्रशेखर जोशींनी आपल्या रसाळ वाणीतून ङ्गङ्घहे वणव्याचे येणेजाणे,हे सलणारे बाभुळ गाणे,दगडाला ही फट असते ना,तिथेच पेरेल माझे दाणे या समर्पक काव्य पंक्तीने गिरिबालाचे कलात्म दृढनिश्चयी व्यक्तीमत्व अधोरेखित केले.अध्यक्षीय भाषणातून साहित्यिक सुरेश साबळे यांनी जिल्ह्यातील नाट्य इतिहासावर प्रकाश टाकून यामध्ये डॉ. गिरीबाला यांच्यासारख्या प्रशिक्षित नाट्यकलावंताची भर पडणार असल्याने जिल्ह्यातील नाट्यसृष्टीचा लौकीक विस्तारत जाणार असल्याचे मत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना डॉ. गिरीबाला सोनुने यांनी कलेतून वर्तमानाची चिकित्सा करता आली पाहिजे, यासाठी मनात प्रश्न निर्माण झाले पाहिजे आणि असे प्रश्न निर्माण होण्यासाठी एनएसडी हे खूप चांगले माध्यम आहे, असे सांगून त्यांनी त्यांच्या प्रवेशाची संपूर्ण प्रक्रिया विषद केली व यश हीच तुमची ओळख निर्माण करत असल्याने कायम ध्येयप्रेरीत जगले पाहिजे,असे मत व्यक्त केले.

यावेळी दिग्दर्शक विजय सोनोने यांच्यासह जयंत दलाल, पंजाबराव आखाडे, प्रा. डॉ. स्वप्नील दांदडे, पराग काचकुरे यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाला लक्ष्मीकांत गोंदकर, अविनाश सोनोने, अभिलाष चौबे, मिनाक्षी सोनुने, विलास मानवतकर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# बाल विवाह मुक्ती रथफ्द्वारे जनजागृती

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते हिरवी झेंडी




**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय आणि अस्मिता फॉउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बाल विवाह मुक्त भारत अभियान मुक्तीरथाला आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ करण्यात आले. बाल विवाह मुक्त भारत अभियान हे भारत सरकार व विविध राज्य सरकारांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवले जाणारे राष्ट्रीय पातळीवरील जनजागृती व कृती अभियान आहे. याचा मुख्य उद्देश १८ वर्षांखालील मुलींचे व २१ वर्षांखालील मुलांचे विवाह पूर्णतः थांबवणे हा आहे. अभियानाच्या माध्यमातून बाल विवाहाची सामाजिक रूढी संपवणे, मुलींचे शिक्षण टिकवून ठेवणे, बालकांचे आरोग्य व सुरक्षित भविष्य सुनिश्चित करणे, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि समाजात जनजागृती वाढवणे हे प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी महसूल समाधान गायकवाड, अनिल गोडगे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि वरिष्ठ अधिकारी यांनी स्वाक्षरी करुन बाल विवाह मुक्त भारत अभियानांतर्गत स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदवला.

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान व कुसुम विशेष सर्व्हेक्षण मोहीम ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी दरम्यान

जनसंचलन/बुलढाणा

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान तसेच कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहीम जिल्ह्यात ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्याबाबत केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार हे अभियान राबविले जाणार आहे. या अभियानांतर्गत पंधरवड्याच्या कालावधीत जिल्ह्यात विविध आरोग्य साक्षरतेचे उपक्रम राबविण्यात येणार असून कुष्ठरोगाविषयी जनजागृती, लवकर निदान व उपचारावर भर देण्यात येणार आहे. स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाच्या अनुषंगाने दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी दालनात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. हरी पवार यांच्यासह संबंधित आरोग्य यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. अभियानांतर्गत शाळांमध्ये प्रार्थनेनंतर कुष्ठरोग प्रतिज्ञेचे वाचन, प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी व कविता वाचन, रांगोळी स्पर्धा, पथनाट्य, म्हणी व घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत.




यासोबतच खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांसाठी कार्यशाळा, महिला मंडळ व बचत गटांचे मेळावे तसेच शालेय विद्यार्थ्यांची प्रभातफेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील सर्व ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, नगरपालिका व महानगरपालिका दवाखान्यांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) विशेष सर्व्हेक्षण मोहिमेअंतर्गत वीटभट्टी, चुना भट्टी, गिट्टी खदान, आश्रमशाळा, वसतिगृहे, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कारागृहे, बालसुधारगृहे, साखर कारखाने, औद्योगिक वसाहती तसेच भटके व स्थलांतरित लोकांची तपासणी करण्यात येणार आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बुलढाणा येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

जनसंचलन/बुलढाणा



बुलढाणा येथे नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात स्वतंत्र भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणा या संस्थेचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने सर तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रशांत पाटील सर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी डॉक्टर कैलास झिने सर यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर माहिती दिली. यावेळी प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष एमबीबीएस चे विद्यार्थी मयुरी पांडे , मुस्कान, ऐश्वर्या खरवडे, गौरव चौधरी, सौरभ जोशी , गजानन शिंदे आदींनी देशभक्तीपर गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच सूत्रसंचालन श्री राजू काटोले यांनी केले. यावेळी डॉ. मोहम्मद लईक, डॉ. निखिल नलावडे, डॉ. राजेंद्र बेदमुथा, डॉ. अजीत शिरसाठ, डॉ.निखिल बोथरा,डॉ. दिपाली कोथळकर , डॉ . सुनील विधाते, डॉ. अर्चना टेकाळे, डॉ. प्राची तायडे, डॉ. आशिष लोखंडे, डॉ. रेश्मा खरात,डॉ. मधुसूदन सावळे, डॉ. पूजा निकस श्री सोमनाथ माठे, प्रशासकीय अधिकारी, यांच्यासह शहरातील वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, परिचारिका, कंत्राटी स्टाफ तसेच एमबीबीएस प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री राहुल जाधव, श्री प्रमोद भोपळे, योगेश बघे, कुणाल गवई, श्री सुरेश बेंडवाल,श्री गजानन भोरकडे,श्री अविनाश हिवाळे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा क्रीडा संकुलात राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल स्पर्धांचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विदर्भ रिजन शुटींगबॉल असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने दि. २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बुलढाणा येथे राज्यस्तरीय शालेय शुटींगबॉल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये १७ वर्षांखालील मुले व मुली सहभागी होणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येकी १० मुले व १० मुली सहभागी होतील. तसेच प्रत्येक विभागातून पुरुष व महिला संघ व्यवस्थापक, तज्ज्ञ पंचाधिकारी, स्वयंसेवक आदींची उपस्थिती राहणार आहे. स्पर्धांचा उद्घाटन समारंभ दि. २९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे मान्यवर अधिकारी, जिल्हा क्रीडा परिषदेचे पदाधिकारी, शिवछत्रपती पुरस्कारार्थी, अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक, विदर्भ रिजन शुटींगबॉल संघटनेचे पदाधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मुलींच्या संघांसाठी नवीन इमारतीत तर मुलांच्या संघांसाठी जुन्या इमारतीत निवास व्यवस्था करण्यात आली आहे. भोजन व्यवस्था देखील जिल्हा क्रीडा संकुल परिसरातच करण्यात येणार आहे. संकुल परिसरात शुटींगबॉलचे दोन अद्ययावत मैदाने तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्पर्धा आयोजनासाठी विविध समित्या जसे की आयोजन समिती, तक्रार निवारण समिती, उद्घाटन समिती, तांत्रिक समिती, मैदान व्यवस्था, भोजन, निवास, वैद्यकीय, प्रसिद्धी व स्वच्छता समिती सक्रियपणे कार्यरत आहेत. निवास व्यवस्था व संकुल परिसराची स्वच्छता पूर्ण झाली असून निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्रे, भोजन पासेस व इतर दस्तऐवजांचे काम अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, दि. २८ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत स्पर्धा असल्याने सैन्य व पोलीस भरती सरावासाठी जिल्हा क्रीडा संकुलातील मैदाने तात्पुरती बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या स्पर्धांचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे तसेच स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांनीही स्पर्धा पाहण्यासाठी नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८